निवेदन व ऋणनिर्देश

रंगभूमी नियतकालिकाच्या अंकांचे वाचन करीत असताना, ग्रंथालयीन अभ्यास (Library Study) हीच अभ्यासाची पद्धती मी अवलंबिलेली आहे. रंगभूमी नियतकालिकाचे अंक वाचून, या नियतकालिकाचे स्वरूप संपूर्णपणे ध्यानात घेतले आणि मग, ' रंगभूमी नियतकालिकातील नाट्यसमीक्षा, एक चिकित्सक अभ्यास हा विषय प्रबंधासाठी निश्चित केला.

रंगभूमी नियतकालिकाचा कालखंड १९०७ ते १९२८ असा आहे. या काळातील नाट्यविषयक लेखनाचे मर्म जाणता येण्यासाठी, मराठी रंगभूमीच्या, नाट्यसृष्टीच्या प्रारंभकाळापासून आकारत गेलेल्या विश्वाशी मनाने समरस होणे आवश्यक होते. त्या काळाची स्पंदने, मानसिक पातळीवर जर भावली नाहीत तर या लेखनाचा खरा अर्थ उमगण्याची शक्यता दुरावेल आणि मग हा अभ्यास ही आनंद-यात्रा न होता एक यांत्रिक क्रिया होईल, या वस्तुस्थितीचे भान असल्यामुळे नाट्यविषयक वाङ्मयाच्या वाचनावर भर दिला. मराठी नाट्यसृष्टीचे दर्शन घडविणारे वैचारिक ग्रंथ, नाट्येतिहास, नट, नाटककार इत्यादीची चरित्रे, आत्मचरित्रे, आठवणीवजा लेखन, जुन्या नियतकालिकांतील नाट्यविषयक लेख, गौरवग्रंथ, मासिकांचे विशेषांक काही जुनी नाटके या सगळ्यांमधून मराठी नाट्य-धर्म कोणता आहे या विषयीची समज हळूहळू येत गेली. मराठी नाट्यसृष्टीच्या अंतरंगाची ओळख पटू लागली रंगभूमी नियतकालिकाची निर्मिती ही एक घटना होती. या घटनेचा अर्थ कळण्यासाठी, तिचे ऐतिहासिक कार्य समजावून घेण्यासाठी, मराठी नाट्यसृष्टीचा विस्तृत पट मनात आकारत जाणे आवश्यक होते. या ग्रंथांच्या सहवासात, आपल्या नाट्यसृष्टीशी माझे नाते दृढ होत गेल्याची अनुभूती घेतली. नाट्यविषयक लेखन करणाऱ्या, केलेल्या सर्व लेखकांची मी ऋणी आहे. मराठी नियतकालिकांची सूची, दाते सूचीचे सर्व खंड, संस्कृतिकोश, अर्वाचीन चरित्र कोश इ. कोशवाङ्मयार्न विविध संदर्भ पुरविले. या कोशकारांचे ऋणही अमाप आहे.

या प्रबंधात एकूण सात प्रकरणे आहेत. संपूर्ण प्रबंध संगणकाच्या साहाय्याने अक्षरजुळणी डी. टी. पी. (Computerised Type-setting) या आधुनिक तंत्राने तयार केला आहे. त्यामुळे मूळ हस्तलिखिताच्या पृष्ठसंख्येच्या निम्म्याच पृष्ठसंख्येत हा सर्व मजकूर सामावला, प्रबंधाचा आकार सुटसुटीत झाला. छपाई लेझर प्रिंटरने केल्याने ती अतिशय सुबक व स्वच्छ झाली. अशाप्रकारे छपाई केलेला हा पहिलाच प्रबंध मराठी विभागाच्यावतीने, पुणे विद्यापीठास सादर केला जात आहे.

संदर्भ टीपा प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी दिलेल्या आहेत. रंगभूमी नियतकालिकातील संदर्भ देताना, वर्ष, अंक, महिना, साल, सदर किंवा लेखाचे शीर्षक, पृष्ठ क्रमांक, अशा क्रमाने दिलेले आहेत. उदाहरणार्थ रंग. व.१, अं.१ ऑगस्ट १९०७ संपादकीय, पृष्ठ क्रमांक प्रकरणाच्या शेवटी आवश्यक वाटले तेथे परिशिष्टे जोडलेली आहेत.

रंगभूमी नियतकालिकाचे ऐतिहासिक महत्त्व ध्यानात घेऊन विविध सूच्या तयार करून प्रबंधात दिलेल्या आहेत. पुढील काळात, मूळ स्वरुपात, हे अंक अभ्यासासाठी उपलब्ध होण्याची शक्यता उत्तरोत्तर दुरावत जाणार असल्यामुळे या प्रबंधात अधिकाधिक सूच्या करून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्या कोणत्या ना कोणत्या संदर्भात पुढील अभ्यासकांना उपयुक्त ठरतील असा विश्वास वाटतो.

या प्रबंधाच्या अभ्यासासाठी मला खालील ग्रंथालयांचा उपयोग झाला. या सर्व ग्रंथालयांच्या ग्रंथपालांची, अधिकाऱ्यांची, सेवकवर्गाची मी ऋणी आहे. या सर्वांनी आपुलकीची वागणूक देऊन तत्परतेने मदत केली.

(१) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, नायगांव, दादर, मुंबई
(२) शासकीय ग्रंथालय, गोखले हॉल, पुणे
(३) शासकीय ग्रंथालय, विश्रामबाग, पुणे
(४) महाराष्ट्र-साहित्य परिषद ग्रंथालय, पुणे
(५) भरतनाट्यसंशोधन मंदीर ग्रंथालय, पुणे
(६) पुणे मराठी ग्रंथालय, पुणे
(७) मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे

(८) भारतीय इतिहास संशोधन मंडळ ग्रंथालय, पुणे
(९) टिळक-स्मारक मंदिर, केसरी-सूची कार्यालय, पुणे
(१०) के सरी कार्यालय, ग्रंथालय, गायकवाड वाडा, पुणे
(११) N.C.P.A.. ग्रंथालय, मुंबई.

प्र बंधाच्या संदर्भात, खालील व्यक्तींची मला बहुमोल मदत झाली. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करते.

डॉ. गो. के. भट यांनी स्वत:ची पुस्तके मला वाचावयास दिली. प्रबंध पुरा झालेला पाहावयास ते हयात नाहीत याचे दु:ख होते. डॉ. भट व श्रीमती सुषमा भट यांनी पूर्वपरिचय नसतानाही जे अगत्य दाखविले, मदत केली त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. श्रीमती सुमित्रा पाठक (अभय प्रिंटींग प्रेस, पुणे) यांनी, त्यांच्या खाजगी संग्रहातील पुस्तके मला दिली. सौ. अनुपमा मुजुमदार यांनीही बहुमोल मदत केली. डॉ. सु. रा. चुनेकर यांनी सूच्या तयार करण्याच्या कामात बहुमोल मार्गदर्शन केले. माझे स्नेही डॉ. कृ. पं. देशपांडे, श्रीमती विनया खडपेकर यांनी मला खूप मदत केली. या सर्वांच्या सहकार्याने हा प्रबंध पुरा झाला.

डॉ. गो. म. कुलकर्णी यांनी अत्यंत आपुलकीने या अभ्यासाबाबत माझ्याशी चर्चा केली त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. डॉ. व. दि. कुलकर्णी यांनी मौलिक मार्गदर्शन केले. त्यांच्या ऋणात मी कायमचीच आहे.

श्री. शेवाळे, सौ. वहीकर यांनी, प्रबंधाच्या संदर्भातील तांत्रिक गोष्टींबद्दल बहुमोल मदत केली. श्री. धनंजय पुरोहित, टायपो-आर्ट्स यांनी, अनेक अडचणींतून मार्ग काढत, अतिशय आस्थेने हा प्रबंध नवीन तंत्राने तयार करून दिला. या सर्वांबद्दल मनात स्नेहाची, कृतज्ञतेची भावना आहे.

डॉ. शं. ना. नवलगुंदकर, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय यांच्याबद्दलही मी कृतज्ञता व्यक्त करते. त्यांनी नेहमीच आपुलकीची वागणूक दिली. तसेच आमच्या मॉडर्न महाविद्यालयाचे

ग्रंथपाल श्री. बापट आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी केलेल्या विशेष मदतीबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

माझ्या प्रबंधाचे मार्गदर्शक डॉ. वि. भा. देशपांडे, मराठी विभाग प्रमुख, मॉडर्न महाविद्यालय यांच्या मदतीशिवाय, मार्गदर्शनाशिवाय हा प्रबंध पुरा होऊ शकला नसता. खेळीमेळीने वागून, अभ्यासासाठी प्रेरणा देण्याची त्यांची हातोटी विद्यार्थ्यांना खूप दिलासा देऊन जाते. त्यांच्यामुळे अभ्यास सुखासमाधानात झाला. त्यांची मी अतिशय ऋणी आहे.

याखेरीज काही व्यक्तींबाबत सुख-दु:खाच्या, कृतज्ञतेच्या, उत्कट भावना अंत:करणात आहेत, पण त्या व्यक्त करू नयेत इतक्या हळुवार आहेत म्हणून येथेच थांबते.

मेधा सिधये